तपासी अधिकारी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** पाथर्डी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0416 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/04/2025 03:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 16/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/04/2025
**Time From (वेळेपासून):** 12:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/04/2025 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/04/2025 03:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जगदंबा रसवंतीगह, बस स्टण्ड सं,पाथर्डी

(c)**In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बाबासाहेब विठ्ठल घुले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोरडगाव,पाथर्डी,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोरडगाव,पाथर्डी,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9604355788

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय बाबासाहेब गर्जे | | | 1. प्लट न 13, फुलेनगर, पाथर्डी, पाथर्डी,पाथर्डी,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 21/04/2025

मी बाबासाहेब विठ्ठल घुले, वय 37 वर्षे, धंदा शेती व पानटपरी, रा. कोरडगाव, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर. समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दि.15/04/2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे, ला.प्र.वि. अहिल्यानगर यांचेशी संपर्क करुन लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि.16/04/2025 रोजी 11/30 वा चे सुमारास पाथर्डी येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी पाथर्डी येथील सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 11/45 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे पुर्ण नाव, पत्ता विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे पथक व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी शासकिय वाहनात बसलो. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, '' मी व माझा भाऊ श्री. वैजिनाथ विठ्ठल घुले असे दोघे पानटपरी व शेती व्यवसाय करतो. दि. 04/04/2025 रोजी पाथर्डी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. तांबे साहेब व त्यांचे पथकाने मी व माझा भाऊ राहत असलेल्या कोरडगाव येथील आमचे राहते घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकुन सदर ठिकाणी सुगंधित तंबाखु, सुपारी, लोखंडी मशिन, तयार सुगंधित मावा व मावा तयार करण्यासाठीची साधनसामग्री मिळुन आली असल्याचे सदर छाप्यामध्ये दाखविले. सदर छाप्यावेळी मी व माझा भाऊ वैजिनाथ घरी हजर नव्हतो. घरी छापा सुरू असताना मला श्री. विजय गर्जे, खाजगी इसम, पाथर्डी यांनी माझे नातेवाईक संजय दहिफळे यांचे मार्फतीने मला त्यांचे घरी बोलवुन घेतले. त्यावेळी मी गर्जे यांचे घरी गेलो. तेथे त्यांनी मला कळविले की, तुमच्या घरी सपोनि श्री. तांबे साहेब यांनी छापा टाकला असुन त्यात सुगंधित तंबाखु, मावा, मशिन अशा वस्तु जप्त केल्या आहेत. सपोनि तांबे साहेब हे माझ्या घरात भाडयाने राहण्यास आहेत. माझी त्यांचेशी चांगली ओळख आहे. त्यांनीच मला छापा टाकलेबाबत कळविले आहे. तुझ्या भावावर जास्तीचे कलम लावुन गुन्हा दाखल होवुन द्यायचा नसेल तर तांबे साहेबांना दोन लाख रूपये (2,00,000/-रु) द्यावे लागतील. पैसे नाही दिले तर तांबे साहेब तुझ्या भावाविरूध्द जास्तीची कलमे लावुन गुन्हा दाखल करून त्याला अटक करतील असे सांगितले. मी त्यांना माझेकडे आता एवढी रक्कम नाही असे सांगितले असता त्यांनी त्यांचे ओळखीचे श्री.तुळशिराम लक्ष्मण धोत्रे उर्फ गोट्या यांचे 9921418631 या मोबाईल नंबरवर ऑनलाईन पध्दतीने पैसे पाठविण्यास सांगितले. माझ्या भावाविरूध्द जास्तीची कलमे लावुन गुन्हा दाखल होईल या भितीपोटी मी माझ्या अकाउंटला एवढी रक्कम नसल्याने माझा आतेभाऊ श्री. मुकुंद सुर्यकांत बडे यांना पैसे पाठविण्यास सांगितले असता त्यांनी धोत्रे यांचे वरील मोबाईल क्रमांकावर फोन पे व्दारे 1,00,000/-रुपये पाठविले. तसेच मी माझे मोबाईल वरून फोन पे व्दारे 50,000/-रुपये पाठविले. एवढी रक्कम पाठवुन सुध्दा सपोनि श्री. तांबे साहेबांनी माझे भावाविरूध्द पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 374/2025, भारतीय न्याय संहिता कलम 123, 223, 274, 275 प्रमाणे दि. 04/04/2025 रोजी सायंकाळी गुन्हा दाखल केला. त्यानंतर दि.15/04/2025 रोजी श्री. विजय गर्जे यांना मी फोन केला व माझे भावाचे अटकपुर्व जामिनासंबंधाने विचारले असता ते मला म्हणाले की, ''तांबे साहेबांनी 2,00,000/- रुपये सांगितले होते, तुम्ही 1,50,000/-रु. एवढीच रक्कम पाठविली, उरलेले 50,000/- रुपये देवुन टाका, विषय मिटवुन टाका, नाहीतर तांबे साहेब तुमच्या भावाचा अटकपुर्व जामिन मंजुर होवु देणार नाहीत, त्याला अटक करतील असे कळविले. मी त्यांना यापुर्वी एवढी रक्कम दिली आहे, आता माझ्याकडे एवढे पैसे नाहीत असे सांगितले. सदरचा घडलेला सर्व प्रकार मी माझा भाऊ वैजिनाथ यास सांगितला व खाजगी इसम गर्जे हे तांबे साहेबांकरीता माझेकडे लाचेची मागणी करत असल्याने मी गर्जे व तांबे साहेब यांचेविरूध्द लाचलुचपत विभागाकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले. त्यावेळी माझ्या भावाने देखील खाजगी इसम गर्जे व सपोनि तांबे यांचेविरूध्द लाचमागणीची तक्रार देण्यास मला पुर्णपणे संमती दिली. सपोनि तांबे साहेब हे खाजगी इसम गर्जे यांचे मार्फतीने माझेकडे वारंवार लाचेची मागणी

करत आहेत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. मी आज रोजी खाजगी इसम विजय गर्जे,यांची भेट घेवुन त्यांचेशी माझे भावाविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयात अटकपुर्व जामिनाबाबत चर्चा करणार आहे, त्यावेळी त्यांनी अटकपुर्व जामिन मिळवुन देण्यास मदत करण्याकरीता तांबें साहेबांकरीता उर्वरित 50,000/-रूपये लाचेची मागणी केल्यास मी त्यांना माझी तांबे साहेबांशी भेट घालुन देण्याबाबत विनंती करणार आहे. त्यांनी माझो तांबे साहेबांशी भेट घालुन दिल्यास मी तांबे साहेबांशी देखील माझे भावाचे अटकपुर्व जामिनाबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी. माझ्यात व खाजगी इसम विजय गर्जे व सपोनि श्री. तांबे, पाथर्डी पोलीस स्टेशन यांचेत कुठल्याही प्रकाराचा आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. गर्जे तसेच सपोनि तांबे यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील. आता मी माझे भावाविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाची एफआयआर, फोन पे व्दारे पैसे पाठविलेबाबतचे स्क्रिन शॉट. छायांकित प्रती हजर करत आहे. वगैरे मजकुराची तक्रार सांगितली व ती माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली त्यावर मी, श्री.त्रिपुटे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर मी नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये श्री.त्रिपुटे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील मोटार सायकलने 12/49 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे खाजगी इसम गर्जे यांचे घराजवळ गेलो. तेथे मी गर्जे यांना फोन केला असता त्यांनी पाच दहा मिनिटे थांब असे सांगितले. थोड्या वेळाने मी पुन्हा गर्जे यांना फोन केला असता त्यांनी ते महाराष्ट्र बँकेत आहेत असे सांगितले. मी त्यांना तिकडे येवु का असे विचारले असता त्यांनी तिकडे येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच 1 असे महाराष्ट्र बँकेजवळ जावुन बँकेच्या बाहेर गर्जे यांची भेट घेतली. तेथे गर्जे यांचेत व माझेत माझे भावाचे अटकपुर्व जामिनाचे तारखेबाबत चर्चा झाली. मी त्यांना 'साहेबांसोबत दोन शब्द बोलुन घेतले असते' असे विचारले असता त्यांनी '' पुढची तारिख पडु दे, साहेब पोलीस स्टेशनलाच आहेत, मी रात्रीच बोललो त्यांना, ते म्हणले माझ्याकडे नाही आले अजुन, कुठे तुझ्या घरी न्यायला आलेत लगेच'' असे म्हणाले. मी त्यांना ''बोलुन घेतलं असतं तर बरं झाल असते '' असे म्हणालो असता त्यांनी ''दुपारी साहेब जेवायला आले का तुला कॉल करतो, साडेतीनला साहेब येतील, त्यावेळी कॉल करतो'' असे सांगितले. त्यानंतर मी व पंच 1 असे तेथुन निघुन माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 13.36 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यावेळी पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. त्याप्रमाणे गर्जे व सपोनि तांबे यांचेविरूध्दची लाचमागणी पडताळणी गर्जे यांचा साडेतीन वाजता फोन आल्यानंतर करण्याचे ठरले.

आम्ही साडेतीन वाजेपर्यंत गर्जे यांच्या फोनची वाट पाहिली. परंतु बराच वेळ झाला तरी गर्जे यांचा फोन आला नाही म्हणुन मी गर्जे यांना फोन केला असता त्यांचा मोबाईल फोन बंद लागला. गर्जे हे दुपारी फोन बंद करून आराम करतात हे मी सापळा पथकास सांगितले. त्यानंतर बराच वेळ वाट पाहुन 18.13 वा. दरम्यान मी गर्जे यांना माझे फोनचा स्पिकर चालु करून फोन लावला. त्यावेळी गर्जे यांनी ते झोपले होते असे सांगुन मला कुठे आहे असे विचारले. मी त्यांना मावस भावाच्या इथे आलो आहे असे सांगितले. गर्जे यांनी '' उदया तारीख वाढवुन घ्या व बायहॅण्ड पत्र घेवुन या, पत्र आले की मग आपण साहेबांकडे जावु असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पत्राचं होईन पण बाकीच सगळं क्लिअर करून घेतले असते, असे म्हणालो असता त्यावर गर्जे यांनी राहिलेले सगळे घेवुन ये उदयाच्याला, आणि तारीख पडली का मला सांग आपण जावु साहेबांकडे, समक्षच जावु पोलीस स्टेशनला असे म्हणाले. सदरचे फोनवरील संभाषण पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरच्या सहायाने ध्वनीमुद्रीत केले. फोनवर झालेल्या संभाषणामध्ये गर्जे यांनी मला अटकपुर्व जामीनावर म्हणणे दयावयाची तारीख पडल्यावर ते पत्र घेवुन समक्ष साहेबांची भेट घेवु असे सांगितले असल्याने पुढील कारवाई पुढची तारीख पडल्यानंतर आयोजित करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे यांनी मला सदर कारवाईबाबत गोपनियता बाळगण्याच्या सुचना सांगुन पुढील तारीख पडल्यानंतर किंवा गर्जे यांचा फोन आल्यानंतर त्यांचेशी संपर्क करण्याचे सांगितले.

त्यानंतर भावाचे अटकपुर्व जामीनाच्या अर्जावरील सुनावणीकरीता पुढील तारीख 22/04/2025 रोजीची पडली असल्याचे मला समजले. मला दि.18/04/2025 रोजी खाजगी इसम गर्जे यांचा फोन आला व त्यांनी मला पुढील

तारिख किती पडली असे विचारले असता मी त्यांना 22/04/2025 अषी तारीख पडली असल्याचे सांगितले. त्यांनी मला उदया दि. 19/04/2024 रोजी ये, साहेब पोलीस स्टेशनलाच आहेत, त्यांचेशी भेट घालुन देतो असे कळविले. सदरची माहिती मी श्री. त्रिपुटे साहेब यांना दिली. त्यांनी मला दि. 19/04/2025 रोजी 12/15 वा. दरम्यान पाथर्डी येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दि. 19/04/2025 रोजी मी 12/15 वा. दरम्यान पाथर्डी येथील सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. त्यावेळी श्री. त्रिपुटे सापळा पथकासह व पंचासह शासकिय वाहनाने सदर ठिकाणी आले. मी शासकिय वाहनात बसलो. श्री. त्रिपुटे साहेबांनी मला व पंच नं. 1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाच्या कार्यवाहीबाबत पुन्हा सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील मोटार सायकलने 13.02 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे खाजगी इसम गर्जे यांची भेट घेण्याकरीता त्यांचे घराजवळ गेलो. तेथे मी गर्जे यांना फोन केला असता त्यांनी अमरापुरमध्ये आलो आहे, तुझी वाट पाहुन असे सांगितले. मी त्यांना ''कधी येवु'' असे म्हणालो असता त्यांनी '' तीन, साडेतीन वाजता जावु, '', असे सांगितले. त्यानंतर मी व पंच 1 असे तेथुन निघुन माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 13.19 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. मी व पंच नं. 1 यांनी घडलेली हकीकत सांगितली. गर्जे यांनी तीन साडेतीन वाजता जावु असे सांगितले असल्याने ते पाथर्डी येथे आले आहेत अगर कसे याबाबत खात्री करण्याकरीता मी माझे मोबाईलचा स्पिकर चालु करून गर्जे यांना 14.45 वा. दरम्यान फोन केला व कुठे येवु असे विचारले असता त्यांनी पोलीस स्टेशनच्या तिथे ये, साहेब आहेत का बघ, आलो लगेच असे म्हणाले. सदरचे फोनवरील संभाषण पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरच्या सहायाने ध्वनीमुद्रीत केले.

गर्जे यांनी पोलीस स्टेशनला ये असे सांगितल्याने मला व पंच नं. 1 यांना गर्जे व सपोनि तांबे साहेबांची भेट घेण्यासाठी रवाना करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे साहेबांनी मला व पंच नं. 1 यांना पुन्हा सर्व सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील मोटार सायकलने 14.50 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे रवाना होवुन पाथर्डी पोलीस स्टेशन जवळ गेलो. आम्ही तेथे बाहेर थांबुन होतो. थोडया वेळाने गर्जे यांचा मला फोन आला. त्यानंतर मी व पंच नं. 1 पोलीस स्टेशनच्या आत गेलो. आम्ही गर्जे यांचेसोबत सपोनि तांबे यांच्या कक्षात जात असताना गर्जे यांनी हाताच्या ईशा-याने पंच नं. 1 यांना बाहेरच थांबण्यास सांगितले. मी व गर्जे सपोनि तांबे यांचे कक्षात गेलो. तांबे साहेबांनी मला ''पाठवले का से चे'' असे विचारले असता मी त्यांना 'नाही पाठवले, बावीस तारीख पडली' असे म्हणालो. त्यावर तांबे साहेबांनी ''देवु पाठवुन'' असे सांगितले. मी त्यांना ''तुम्हाला पत्र नाही आले का'' असे विचारता त्यांनी आले असेल, परंतु मी बाहेर होतो असे सांगितले. त्यानंतर आमचेत माझे भावावर दाखल गुन्हयाचे संबंधाने व गावचे यात्रेसंबंधाने तसेच इतर विषयांवर चर्चा झाली. त्यानंतर मी व गर्जे असे सपोनि तांबे साहेबांच्या केबिनच्या बाहेर आलो. गर्जे यांनी मला जामिन होवुन जाईल, पॉझिटिव्ह देतो असे म्हणाले असता मी त्यांना ''जे राहीलेत पन्नास समजा, तेवढे फक्त वीस हजार सोडा'' असे म्हणालो. त्यावर गर्जे यांनी उद्या पैसे घेवुन ये सकाळी, साहेबाला मस्त जेवायला घेवुन जावु, उद्या रविवार आहे, वार चांगला आहे, सोय कर चांगली असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच 1 असे तेथुन निघुन माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 15.32 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. मी व पंच नं. 1 यांनी घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डीग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये खाजगी इसम गर्जे यांनी माझेकडे 50,000/-रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 30,000/-रु लाचेची रक्कम स्विकारण्याची संमती दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले. गर्जे यांनी मला उद्या पैसे घेवुन ये असे सांगितल्याने त्यांचेविरूध्द दि. 20/04/2025 रोजी पुढील कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले. श्री. त्रिपुटे साहेबांनी मला दि. 20/04/2025 रोजी 11/00 वा. पाथर्डी येथील सुरक्षित ठिकाणी लाचेच्या रक्मेसह हजर राहण्यास सांगुन गोपनियतेच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी आज दि. 20/04/2025 11/00 वा. पाथर्डी येथील सुरक्षित ठिकाणी थांबलो. थोड्या वेळाने श्री. त्रिपुटे साहेब सापळा पथकासह व पंचासह शासकिय वाहनाने सदर ठिकाणी आले. मी शासकिय वाहनात बसलो. त्यानंतर मी लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी माझ्या बचतीतुन 30,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 60 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. सापळा पथकातील पोहेकॉ गुंगुल यांनी सापळा कारवाईत अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून सर्व नोटांना दोन्ही बाजुंनी अँन्थ्रासिन पावडर लावली. त्यानंतर सदर लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत

मला व सापळा पथकाने आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इशारा ठरवुन दिला. त्यानंतर खाजगी इसम गर्जे यांचेविरुध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. श्री.त्रिपुटे यांचे सुचनेवरुन पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर गर्जे कोठे भेटतील याची खात्री करण्यासाठी माझे मोबाईलवरुन गर्जे यांना फोन करुन विचारले असता त्यांनी कोरडगाव रोडला य असे सांगितले. सदरचे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर गर्जे यांचेविरुध्द कोरडगाव रोड चौकात सापळा लावण्याचे ठरले. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे ताब्यात दिले. मला व पंच नं. 1 यांना माझेकडील दुचाकीने गर्जे यांची भेट घेण्यासाठी कोरडगाव चौक येथे जाण्याकरीता रवाना करण्यात आले. त्याप्रमाणे आम्ही रवाना झालो. आमचे पाठोपाठ श्री. त्रिपुटे व सापळा पथक आले. आम्ही कोरडगाव चौकात गेल्यानंतर मी गर्जे यांना फोन केला असता त्यांनी पुन्हा स्टेट बँकेजवळील रसवंतीगृह येथे येण्याचे सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच 1 असे माझे दुचाकीने बस स्टॅण्ड समोरील जगदंबा रसवंतीगृहाजवळ येवुन माझी दुचाकी उभी केली. गर्जे हे सदर रसवंती गृहात बसलेले होते. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच 1 असे सदर रसवंतीगृहात गेलो. गर्जे यांना मी ''से द्या म्हणाव '' असे म्हणालो असता त्यांनी '' से दयावाच लागेल, साहेब काल काय म्हणले सर्व कायदेशीर मदत होईल, तेवढ वजन आहे माझ, लोड घेवु नको'' असे म्हणाले. त्यानंतर माझेत व गर्जे यांचेत आमचे व्यवसायाबाबत चर्चा झाली. त्यानंतर गर्जे यांनी मला आणले का तीस असे विचारले असता मी माझे जवळील लाचेच्या रक्कमेची घडी गर्जे यांचेसमोर धरली. गर्जे यांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.त्रिपुटे, सापळा पथक व पंच क्र.2 असे माझेजवळ आले, पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझ्या ताब्यातुन घेवुन बंद केले, श्री. त्रिपुटे साहेबांनी मला व पंच नं.1 यांना लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता आम्ही समोर उभे असलेले गर्जे यांचेकडे बोट दाखवुन हे खाजगी इसम गर्जे आहेत त्यांनी लाच रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांनी पंच क्र. 2 च्या मदतीने सदर लाच रक्कम ताब्यात घेतली व सोबतच्या कर्मचा-यांच्या मदतीने गर्जे यांना ताब्यात घेतले. श्री. त्रिपुटे यांनी गर्जे यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विजय बाबासाहेब गर्जे, वय 48 वर्षे, धंदा नोकरी, शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लमाणतांडा, ता.आष्टी, जि.बीड, रा. प्लॉट नं. 13, फुलेनगर, पाथर्डी, जि.अहिल्यानगर असे सांगितले. गर्जे यांना रसवंती गृहाचे समोर पकडलेले असल्याने व सदरचे ठिकाण हे खुप गर्दीचे असल्याने सदर ठिकाणी पुढील कामकाज करणे शक्य होणार नसल्याने पुढील कामकाज ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे जावुन करण्याचे ठरले. तत्पुर्वी सुरक्षित ठिकाणी शासकिय वाहनात गर्जे यांच्या तपासण्या करण्यात आल्या. तसेच माझ्या देखील तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे येण्यास सांगुन ते गर्जे यांना पकडलेल्या स्थितीत घेवुन शासकिय वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे आले. मी त्यांचे पाठोपाठ सदर कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी श्री.त्रिपुटे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी दिनांक 16/04/2025 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 12/49 ते 13/36 वा. दरम्यान, दि. 19/04/2025 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 14/50 ते 15/32 वा. दरम्यान खाजगी इसम गर्जे यांनी माझेकडे माझे भावाविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात मदत करण्याकरीता व अटकपुर्व जामीन मिळुन देण्यास मदत करण्याकरीता सपोनि श्री.तांबे यांचेकरीता 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 30,000/-रु. लाच रक्कम स्विकारण्यास संमती दर्शविली व सदर लाचेची रक्कमं दि.20/04/2025 रोजी जगदंबा रसवंतीगृह, बस स्टॅण्ड समोर, पाथर्डी येथे लाचेच्या सापळा कारवाई वेळी 12/21 ते 12/53 वा. दरम्यान गर्जे यांनी माझेकडुन स्विकारली आहे. म्हणुन माझी विजय बाबासाहेब गर्जे, वय 48 वर्षे, धंदा नोकरी, शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लमाणतांडा, ता.आष्टी, जि.बीड, रा. प्लॉट नं. 13, फुलेनगर, पाथर्डी, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

santosh ramchandra mutkule(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Fulc. 3.V

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पायधुनी पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): santosh ramchandra
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):